# पोवार, पंवार वंशाचा इतिहास व संस्कृती : एक दृष्टिक्षेप

**डॉ. सौ. धनश्री राणे**
विभाग पमुख (गृहअर्थशास्त्र)
भवभुती महाविद्यालय, आमगांव

---

पोवार, पंवार, परमार जातीचा इतिहास फार वैभवशाली राहिलेला आहे. युद्धभूमीमध्ये विरतेचा परिचय देणाऱ्या आपल्या कुशल नेतृत्वाचा परिचय देणाऱ्या या नात्याने या जातीचे लोक विख्यात आहेत. पोवार, पंवार, परमार मुलत: महर्षी वशिष्ट यांच्या यज्ञ अग्निकुंडातून उत्पन्न झालेले आहेत. म्हणून हे अग्निवंशी मानले जातात व क्षत्रियतेचा परिचय देऊन राजवंश जोपासल्याने प्राचीन काळापासून या जातीची समाजात विशेष मान्यता आहे. पोवार, पंवार वंशाच्या प्राचीन राज्यांनी बिंदेशिखरावर धारा नगरी आणि मांडू या दोन नगरांची स्थापना केली. पंवार (पोवार) वंशात एक भोज नामक प्रतिभाशाली आणि प्राक्रमी राजा यशोमान, किर्तीमान आणि प्रकाशमान झाला. पोवार वंशाच्या शासकांनी माहिष्मती, धारानगरी, मांडू, उज्जयिनी, चंद्रभागा, चित्तौड, आबू, चंद्रावती, महू, मैदान, पवारवती, अमरकोट, विखार, होहदुबी आणि पाटण इत्यादी नगरात वास्तव्य केले. मालवाच्या परमार मुंजने आबूला जिंकून आपले पूत्र अरण्यराज आणि चंदन याना क्रमश: आबू आणि जवालीपूरचे शासन सुपुर्द केले अशा प्रकारे आबू, जालौर, सिरोही, पालनपुर, मारवाड, दांता राज्याच्या कित्येक गावांवर अधिकार प्राप्त झाला. आबु पर्वतावर अचलगड़चा किल्ला आणि चंद्रावती नगर परमारांनीच स्थापीत केला. परमारानी १० व्या शतकात मालवा, मौर्यांकडून जिंकून उजैन नगरीला आपली राजधानी बनविली. त्यानंतर सवंत् १३६८ पर्यंत आबुवर यांचे राज्य होते.

आबुचा प्रथम राजा सिंधुराज संवत् १००० मध्ये होऊन गेला. सिंधुराज्याचा पाचव्या पिढीमध्ये धरणीवराह पवार होऊन गेला. त्यांनी आपल्या राज्याचे नव भाग करून स्वत:सह आपल्या नऊ भावामध्ये विभागणी केली. या नऊ भागांना मारवाड़ नवकोट म्हणून ओळखले जाते.

पोवार, पंवार वंशाचे वीर व न्यायप्रिय राजा विक्रमादित्य यांनी विक्रम संवत् ची स्थापना केली. उज्जैन ही त्यांची राजधानी होती. पोवार, पंवार वंशाचे मालवाचे राजा उदयादिप व त्यांचे पुत्र जगदेव हे सुद्धा अतिशय प्रसिद्ध पावले होते.

पंवार वंशाच्या एकूण ३६ शाखा आहेत त्या पुढीलप्रमाणे: १) मोरी, २) सोडा, ३) सांकला, ४) खैर, ५) उमरा, ६) सुमरा, ७) वेहिल, ८) बिहिल, ९) मेपावत, १०) बुल्हर, ११) काबा, १२) ऊमट, १३) रेहवर, १४) तुण्डा, १५) सोरटिया, १६) हरेलके, १७) चोंदा, १८) खेजूर, १९) सुगडा, २०) बरकोटा, २१) पूनी, २२) सम्पल, २३) भीवा, २४) कालपुसर, २५) कलमोह, २६) कोहीला, २७) पूसया, २८) कहोरिया, २९) धुंदा, ३०) देवा, ३१) बरहर, ३२) जीप्रा, ३३) पौसरा, ३४) धुंत्ता, ३५) टिकुंबा, ३६) टीका.

पोवार जातीची ऐतिहासिक व सामाजिक परंपरा सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ आहे आणि

म्हणून सांस्कृतिक गौरवशाली परंपरेने संपन्न असल्याचे दिसून येते. आपल्या ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक परंपरा या समाजाने आजही सांभाळून ठेवलेल्या आहेत. नव्या पिढीमध्ये धार्मिक पर्व, खाद्यसंस्कृती, अस्त्र, शस्त्र, वस्त्र, परंपरा, अलंकार पद्धती, संस्कार आणि बोलीभाषा, उत्तम गोष्टी शिकण्याच्या सवयी अजूनही जपलेल्या आहेत.

अलीकडे मोठया शहरांमध्ये जे पोवार जातीचे लोक वास्तव्य करीत आहेत. त्यांच्यात शहरी संस्कृतीप्रमाणे व अत्याधुनिक शिक्षणपद्धतीच्या प्रभावाने कौटुबिक जीवनात थोडे फार बदल झालेले आहेत. परंतु ग्रामीण भागात विशेषत: पोवार बहुल भागात आपल्या संस्कृती व परंपराचे जतन व संवर्धन अजूनही होत असल्याचे तसेच पोवारी बोलीभाषा बोलली जात असल्याचे दिसून येते.

पोवार समाज अतिथी सत्काराला विशेष महत्व देतो. आपल्या दारावर आलेला कोणीही उपासीपोटी जाऊ नये ही बाब तो गंभीरतेने घेतो व दखल घेऊन भोजन व्यवस्था करतो. अजूनही ग्रामीण भागात अतिथी घरी प्रवेशताच त्याला पाय धुण्याकरिता पाणी दिल्या जाते. आदरपूर्वक आसन देणे व आस्थापूर्वक चौकशी केली जाते.

पोवार जातीने स्त्री जातीचा सन्मान व तिच्या विकासाचे लक्ष्य सातत्याने जपलेले आहे. मुलांच्या बरोबरीने मुलींना सन्मानाची वागणूक देणे, तिच्या आवश्यक गरजांची पूर्ती करणे, तिला शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणे या बाबतीत अग्रेसर आहे. मुलीला समर्थ बनवून विवाहाच्या प्रसंगी कुठल्याही प्रकारचा हुंडा न घेता तिला प्रत्यक्ष जीवनात समर्थपणे जगण्यासाठी मानसिक पाठबळ परंपरा अजूनही समाजात कायम आहे.

**पोवार जातीतील पारंपारिक संस्कार :**

पोवार समाजामध्ये पिढयान पिढयापासून इलाहाबाद (प्रयागराज) व काशीच्या पंडितांकडून नवयुवकांना विधिवत गुरूदिक्षा दिली जाते. अथवा स्थानिय ब्राम्हण, गोसावी, बैरागी यांचेकडूनही विधीवत दिक्षा दिली जाते. हा कार्यक्रम कॅलेंडरनुसार शुभ तिथी पाहून संपन्न केला जातो.

**शिशु जन्म :**

पोवार समाजामध्ये पेशावर दायीच्या निगरानीमध्ये घरीच प्रसूती केली जात असे. जीवजंतु, संक्रमन, भूतपिशाच्य च्या प्रतिकारासाठी टेंभरूनच्या झाडाची काठी घराच्या फाटक अथवा दारासमोर आडवी ठेवली जाते.

नवजात बालकाची नाळ झडल्यानंतर सहाव्या दिवशी फाटकावर ठेवलेली टेंभरूनची काठी जाळून टाकली जाते व छटीचा कार्यक्रम केला जातो. या प्रसंगी शिशुच्या डोक्यावरील केश काढले जातात. याला जावळ काढणे असे म्हणतात. यावेळी शिशुच्या कमरेला आजी किंवा आत्या कडून कमरदोरा बांधला जातो.

शिशु सव्वा महिन्याचा झाल्यानंतर बारसा समारोह करण्यात येतो. त्यालाच 'नामकरण विधी' असेही म्हणतात. शिशुच्या जन्मानंतर येणाऱ्या प्रथम दिवाळीला खिर चटाई कार्यक्रम

केला जातो. माता नवशिशुला मांडीवर घेऊन देवघरात किंवा तुळशी वृंदावनासमोर खिर खाऊ घालते. या प्रसंगी बालक अथवा बालिकेस नवीन वस्त्र परिधान केले जाते. मुलाला दाढ़ी येऊ लागताच त्याने तारूण्यावस्थेत प्रवेश केला असे समजले जाते अशा तरूणाची दाढ़ी काढण्याचा कार्यक्रम विवाह प्रसंगी होत असे.

**विवाह संस्कार :**

तारूण्यानंतर योग्य वधू निश्चित होताच मोठया थाटामाटात विवाह संपन्न होतो. पोवार समाजात प्राचीन काळी सप्ताहभर वैवाहिक कार्यक्रम चालत असे. अलीकडे तो दोन किंवा एक दिवसातच संपन्न होतो. विवाहामध्ये दहेज किवा हुंडा प्रथा नाही. प्राचीन काळी वर पक्षाकडून वधू पक्षाला सोन्याच्या किंवा रक्कमेच्या रूपात हुंडा दिला जात असे. हल्ली ही प्रथा संपुष्टात आली आहे. लग्नामध्ये पाच किंवा सात मंगलाष्टके म्हणून राम नवरदेव सीता नवरी सावधानचा उल्लेख करून ब्राम्हणाविनाही विवाह संपन्न होत असतो. लग्नानंतर सप्तपदीने कार्यक्रमाची पूर्णत: होते. लग्नामध्ये केवळ मंगळसूत्र हा प्रामुख्याने आवश्यक अलंकार असतो. इतर अलंकार ऐच्छिक असतात. वधू पक्षाकडून या प्रसंगी जीवनावश्यक वस्तू भेट म्हणून दिल्या जातात.

पूर्वीच्याकाळी वैवाहिक कार्यक्रम आठवडयाभर चालत असल्याने साक्षगंध, कुलदेवपुजा, मंडपाच्छादन, मातृकापुजन, डेरीपुजन, मंडपसुताई, खनमाती दस्तूर, नांदळप्रज्वलन, माहेदसाई, काकनबंधाई, बिजोरा (वर—वधू चढावा), हल्दी अहेर, लगून बरात, वरातीचे आदरातिथ्य, नवरदेव उतरवणे, मंडप प्रवेश, जाणोसा, पाणीग्रहण विधी, आंदन किंवा दहेज, चरणपूजन कार्यक्रम, वालाचे दाणे खेळ, कुसुम्बा, कन्यादान, वरवधू वरात प्रस्थान, वरपक्षाकडे नवदाम्पत्याचे स्वागत, राखळी वळीचा दस्तुर, ढेंडो, चौमास (गौना) इत्यादी कार्यक्रम वैवाहिक विधी व संस्कार निमित्ताने संपन्न होत असत. ही संस्कृती ग्रामीण भागात आजतागायत कार्यरत आहेत.

**मुख्य व्यवसाय :**

पोवार जातीचा पिढयान पिढया चालत आलेला व्यवसाय हा शेती आहे. बहुसंख्य पोवार समाज नदी काठावर पिढयान पिढया वस्ती करून राहत असल्याने धान्य (भात) पिकाचे उत्पादन करीत असतात. शेतीशी संबंधित सर्व कामे विशेषत्वाने कुटुंब प्रमुखासह कुटुंबातील सर्व सदस्य करतात.

**संदर्भग्रंथ सूची :**


- पंवार जाति का इतिहास — प्रकाशक: दामोदर ब्रिजलाल टेंभरे, बालाघाट (मध्यप्रदेश), प्रथमावृत्ति, सन १९६७
- पवारी ज्ञानदीप — लेखक: डॉ.ज्ञानेश्वर टेंभरे, प्रकाशक: हिमालया पब्लिशिंग हाऊस, गिरगांव, मुंबई — ४०००४
- पवारवाणी वार्षिक पत्रिका २०२० — प्रकाशक: पवार क्षत्रिय संगठन, रायपूर (छत्तिसगढ़).

- पवार समाज दर्शन बैहर — प्रकाशक: राष्ट्रीय पावर क्षत्रिय अधिवेशन विशेषांक २०२० महासभा — २०२०
- पंवार दर्पण वार्षिक पत्रिका २००५ — प्रकाशक: पंवार रामंदिर ट्रस्ट सिंहद्वार, बैहर (म.प्र.)
- पंवार दर्पण वार्षिक पत्रिका २००६ — प्रकाशक: पंवार रामंदिर ट्रस्ट सिंहद्वार, बैहर (म.प्र.)
- पंवार दर्पण वार्षिक पत्रिका २००८ — प्रकाशक: पंवार रामंदिर ट्रस्ट सिंहद्वार, बैहर (म.प्र.)